महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/०६७५८
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : २३/०३/२०१७

# शुद्धिपत्रक

(म.रा.वि.वि.कं.मर्या.सेवाविनियम २००५)

**विषय :** महावितरण कंपनीमधील विकलांग अपत्य असलेल्या कर्मचाऱ्यांना विशेष बाल संगोपन रजा मंजूर करणेबाबत.

.......

महावितरण कंपनीमधील महावितरण कंपनीमधील विकलांग अपत्य असलेल्या कर्मचाऱ्यांना विशेष बाल संगोपन रजा मंजूर करणेबाबतची तरतूद सेवाविनियम क्र.५३ (छ) म.रा.वि.वि.कं.मर्या. सेवाविनियम २००५ चे सुधारपत्र क्र.३५ दि.१८.०२.२०१७ अन्वये अंतर्भूत करण्यात आलेली आहे. सदर सुधारपत्राचा क्रमांक ३५ ऐवजी आता ३७ असा वाचण्यात यावा.

२. सदर शुद्धिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

२३/३
(संदेश हाके)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\Corrigendum - F.N.2-B - Chield Care Leave.docc*

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.२-ब/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

## सुधारपत्र क्र. ३५ दि. १८ / ०२ /२०१७

(म.रा.वि.वि.कं.मर्या.सेवा विनियम २००५)

विषय : महावितरण कंपनीमधील विकलांग अपत्य असलेल्या कर्मचाऱ्यांना विशेष बाल संगोपन रजा मंजूर करणेबाबत.

.......

प्रशासकीय परिपत्रक क्र.१ दि.२९.०९.२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) व संचालक (प्रकल्प) यांच्याशी विचारविनिमय करून महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.५७/सेवा-६ दि.२१.०९.२०१६ च्या धर्तीवर विकलांग अपत्य असलेल्या महावितरण कंपनीमधील कर्मचाऱ्यांना 'विशेष बाल संगोपन रजा' अनुज्ञेय करण्याबाबत मंजुरी प्रदान केलेली आहे.

२. या अनुषंगाने म.रा.वि.वि.कं.म.कर्मचारी सेवाविनियम २००५ मधील सेवाविनियम क्र.४१ (१) (ढ) येथे 'विशेष बाल संगोपन रजा' समाविष्ट करण्यात येत आहे.

३. तसेच म.रा.वि.वि.कं.म.कर्मचारी सेवाविनियम २००५ मध्ये सेवाविनियम क्र.५३ (छ) खालील प्रमाणे अंतर्भूत करण्यात येत आहे.

**<u>सेवाविनियम क्र.५३(छ)</u> : विशेष बाल संगोपन रजा**

विकलांग अपत्य असलेल्या कंपनीच्या स्थायी किंवा अस्थायी पदांवर कार्यरत महिला व पत्नी नसलेले पुरूष कर्मचारी हे विशेष बाल संगोपन रजा मिळण्यास पात्र असतील. या प्रयोजनास्तव विकलांगता खालील नमूद केल्यानुसार असावी.

१) विकलांग व्यक्तींसाठी (समानसंधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील कलम २(झ) नुसार पुढील विकलांगता :

(१) अंधत्व (Blindness), (२) क्षीण दृष्टी (Low vision), (३) बरा झालेला कुष्ठरोग (Leprosy-cured), (४) श्रवण शक्तीतील दोष (Hearing impairment), (५) चलन-वलन विषयक विकलांगता (Loco Motor disability), (६) मतिमंदता (Mental retardation), (७) मानसिक आजारपण (Mental illness) सदर विकलांगता उपरोक्त अधिनियमातील विकलांगतेबाबतच्या व्याख्येप्रमाणे असणे अनिवार्य राहील तसेच सदर विकलांगता किमान ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त आहे, असे वैद्यकीय प्राधिकरणाने प्रमाणित केले पाहिजे.

२) दि नॅशनल ट्रस्ट फॉर दि वेलफेअर ऑफ पर्सन्स विथ ऑटीझम, सेरेब्रल पाल्सी, मेंटर रिटार्डेशन आणि मल्टीपल डिसॅबिलीटी ॲक्ट १९९९ मधील कलम २(ए), २(सी), २(जी), २(एच) व २(ओ) मध्ये वर्णन केल्यानुसार अनुक्रमे आत्ममग्न (Autism), सेरेबल पाल्सी (cerebral palsy), मतिमंद बहुविकलांग व गंभीर स्वरुपाची विकलांगता असलेले अपत्य.

**टीप :-**

अशा प्रकारची विशेष बाल संगोपन रजा महावितरण कंपनीतील कार्यरत कर्मचाऱ्यांना खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून अनुज्ञेय होईल.

१) उपरोक्त सेवाविनियम क्र.५३(छ)(१) मधील विकलांगतेबाबत जिल्हा शल्य चिकित्सक (Civil Surgeon) अथवा त्यापेक्षा वरिष्ठ शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याने अथवा शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्णयानुसार निर्गमित केलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२) सदर रजा हक्क म्हणून मागता येणार नाही. सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्व मान्यतेनेच सदर रजा घेता येईल.सदर रजा विकलांग अपत्याच्या वयाच्या २२ वर्षापर्यंत घेता येईल.

३) सदर रजा पहिल्या २ हयात अपत्याकरिता लागू राहील.

४) विशेष बाल संगोपन रजेच्या कालावधीसाठी रजेवर जाण्याच्या लगतपूर्वी जेवढे वेतन मिळत असेल तेवढेच रजा वेतन देण्यात येईल.

५) सदर रजा एकाहून अधिक हप्त्यामध्ये (Spell) तथापि एका आर्थिक वर्षात तीनापेक्षा जास्त हप्त्यामध्ये नाही अशा मर्यादेत घेता येईल.

६) विशेष बाल संगोपन रजेचा हिशोब योग्यरित्या सेवापुस्तकात नोंदविण्यात यावा.

७) परिविक्षाधीन कालावधीत विशेष बाल संगोपन रजा मान्य करता येणार नाही. तथापि, कर्मचाऱ्यास विकलांग अपत्याबाबतच्या गंभीर परिस्थितीमुळे रजा घेणे अत्यावश्यक आहे अशी रजा मंजूर करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री झाल्यास, परिविक्षाधीन कालावधीत अपवादात्मक परिस्थितीत कमीत कमी कालावधीची विशेष बालसंगोपन रजा घेता येईल. त्या प्रमाणात संबंधित महिला/पुरुष शासकीय कर्मचाऱ्याचा परिविक्षाधीन कालावधी वाढविला जाईल.

८) विशेष बाल संगोपन रजेस पात्र असणारा महिला/पुरूष शासकीय कर्मचारी एकापेक्षा जास्त वेळा नवीन नियुक्ती स्विकारत असेल अशा बाबतीत वेगवेगळया ठिकाणच्या कालावधीची रजा एकत्रित गणली जाऊन, अशा एकूण सेवेच्या कालावधीमध्ये एकूण ७३० दिवस इतकीच रजा अनुज्ञेय होईल.

९) अर्ज केल्यास विशेष बाल संगोपन रजेला जोडून अन्य अनुज्ञेय रजा जोडून घेता येईल मात्र अन्य अनुज्ञेय रजा कालावधी एक वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

१०) विकलांग अपत्य शासकीय कर्मचाऱ्यावर अवलंबून आहे, असे प्रमाणपत्र शासकीय कर्मचाऱ्याने सादर करणे अनिवार्य राहील.

११) सदरची रजा कंत्राटी पद्धतीवर कार्यरत कर्मचाऱ्यांना लागू राहणार नाही.

४. अर्जित रजा मंजूर करण्याकरिता म.रा.वि.वि.कं.मर्या.सेवाविनियम २००५ शी संलग्नित नववी अनुसूचीमध्ये विहित करण्यात आलेले सक्षम अधिकारी हे 'विशेष बाल संगोपन रजा' मंजूर करण्यात सक्षम अधिकारी राहतील.

५. सदरची तरतूद या संदर्भात पारित करण्यात आलेल्या आदेशाच्या तारखेपासून लागू होईल.

६. सदर सुधारपत्र महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

( संदेश हाके )
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\F.N.2-B-Corrigondum-Spl.Child Care.doc*